**माथाडी कामगारांची माथाडी मंडळात**
**नोंदणी करावयाच्या पध्दता.**

महाराष्ट्र शासन
उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग,
शासन निर्णय क्रमांकःयुडब्ल्युए-१५२००६/(२११/०६)/कामगार-५
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२,
दिनांकः-२१.१.२००९

**पहा**:- १) शासन आदेश क्र.युडब्ल्युए-१५९५/(२९४६)/कामगार-५, दि.३०.९.१९९५
२) शासन आदेश क्र.युडब्ल्युए-१५९५/(२९४६)/कामगार-५, दि.२२.१.२००१
३) शासन आदेश क्र.युडब्ल्युए-१५२००६/(२११/०६)/कामगार-५, दि.२५.९.२००६
४)शासन आदेश क्र.युडब्ल्युए-१५२००६/(२११/०६)/कामगार-५, दि.८.१.२००८
५)शासन आदेश क्र.युडब्ल्युए-१५२००६/(२११/०६)/कामगार-५, दि.१९.३.२००८

**प्रस्तावनाः-**

महाराष्ट्र माथाडी हमाल व इतर श्रमजिवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ अंतर्गत माथाडी मंडळांसाठी तयार करण्यात आलेल्या योजनेअंतर्गत माथाडी मंडळांमध्ये एखादे काम वाढले असेल व तेथे कामगारांची संख्या नव्याने वाढविणे आवश्यक असेल तर पूर्वीप्रमाणे प्रथमतः मंडळातील नोंदीत बेकार कामगारांना प्राधान्य दयावे. मात्र या कामगारांबाबत पूर्वी काम करीत असलेल्या कामगारांची नोंदणी करणे आवश्यक असल्यास पर्याप्त कारणे व समर्थन देऊन अशी प्रकरणे शासनाची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे. मात्र या संदर्भात काही प्रकरणात पर्याप्त समर्थन असेल तर अशा प्रकरणी माथाडी कामगारांची नोंदणी करण्यासंदर्भात संबंधित माथाडी मंडळाने अशी नवीन नोंदणी करण्याचा प्रस्ताव संपूर्ण समर्थनासह शासनाच्या मान्यतेसाठी सादर करावा व त्याबाबतच्या शासनाच्या मान्यतेनंतरच नवीन कामगारांची नोंदणी करावी असे आदेश शासनाने दि.२५.९.२००६ रोजी निर्गमित केले होते.

तद्नंतर शासनाने दि. २५.९.२००६ च्या आदेशात बदल करुन सदर आदेश हे फक्त बृहन्मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, रायगड व नाशिक या जिल्हयांसाठीच लागू राहतील असे नमूद करुन दि.८.१.२००८ रोजी नव्याने आदेश निर्गमित केले होते. तद्नंतर पुन्हा दि.८.१.२००८ रोजीच्या आदेशात बदल करुन सदर आदेशात उपरोक्त जिल्हयातील माथाडी मंडळांनी फक्त नवीन मालकाकडे नव्याने नोंदीत होणाऱ्या माथाडी कामगारांचे प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी पाठवावे असे नमूद करुन दि.१९.३.२००८ रोजी आदेश निर्गमित केले व इतर जिल्हयातील माथाडी मंडळांनी दि.२२.१.२००१ रोजीच्या शासन आदेशानुसार कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आले होते.

तथापि माथाडी कामगारांच्या नोंदणीबाबत शासनाने निर्गमित केलेल्या उपरोक्त आदेशाबाबत सर्वांगीण विचार करुन सदर आदेशात बदल करण्याचे ठरविले आहे. त्याअनुषंगाने यापूर्वीचे समक्रमांकाचे दि.१९.३.२००८चे शासन आदेश अधिक्रमित करुन शासन खालीलप्रमाणे नव्याने शासन निर्णय निर्गमित करीत आहे.

G:Aadesh -7(4)(P).lwp

**शासन निर्णयः-**

सर्व माथाडी मंडळांनी त्यांच्या योजनेमध्ये असलेल्या तरतुदीच्या अनुषंगाने नवीन मालकाकडे नवीन माथाडी कामगार, तसेच एखाद्या मालकाकडे काम वाढले असेल व तेथे माथाडी कामगारांची संख्या वाढविणे आवश्यक असल्यास, तसेच राजीनामा दिलेल्या कामगाराच्या जागी माथाडी कामगारास नोंदीत करावयाचे असल्यास, तसेच एका टोळीतून दुस-या टोळीत माथाडी कामगारांची बदली करावयाची असल्यास, तसेच अनुकंपा तत्वावर माथाडी कामगाराची नोंदणी करावयाची असल्यास तसेच, काही मंडळांमध्ये एखाद्या मालकाकडे मासिक पगारावर असलेल्या माथाडी कामगारांच्या टोळीत नवीन कामगारांची वाढ करावयाची असल्यास संबंधित मंडळाने त्यांच्या पातळीवर खालीलप्रमाणे कारवाई करावी.

**१) नवीन मालकाकडे नवीन माथाडी कामगारांच्या नोंदणीबाबत खालील बाबींची पूर्तता झाल्यानंतर माथाडी कामगारांची नोंदणी करावी.**

१ संबंधित मालकाची शिफारस

२ संबंधित निरीक्षकाचा अहवाल

३ संबंधित माथाडी कामगारांच्या जन्मतारखेचा दाखला

४ संबंधित माथाडी कामगाराच्या वारसाचा दाखला.

५ जे माथाडी कामगार शिकलेले नाहीत अथवा माथाडी कामगारांच्या जन्माची नोंद नाही. अशा माथाडी कामगारांच्या बाबतीत संबंधित ग्रामपंचायत / नगरपालिका / महानगरपालिका यांच्याकडून वयाबाबतचा पुरावा प्राप्त करुन घेणे.

६ मालकाच्या कामाचे स्वरुप बघून तेथील माथाडी कामगारास पोलीस पडताळणी आवश्यक असल्यास पोलीस पडताळणी प्राप्त करुन घेणे.

**२) मालकाकडे काम वाढले असेल व तेथे कामगारांची संख्या वाढविणे आवश्यक असेल अशा कामगारांच्या नोंदणीबाबत खालील बाबींची पूर्तता झाल्यानंतर माथाडी कामगारांची नोंदणी करावी.**

१ संबंधित माथाडी कामगारांच्या टोळीकडून टोळी वाढ करण्याबाबतची लेखी मागणी प्राप्त करुन घ्यावी.

२ तद्नंतर माथाडी मंडळातील नोंदीत माथाडी कामगार बेकार असल्यास त्यांना काम देण्यात यावे.

३ बेकार असलेल्या नोंदीत माथाडी कामगारंना सदर ठिकाणी काम करण्यास नकार दिल्यास त्या ठिकाणी संबंधित टोळीमधील २/३ (दोन तृतियांश) कामगारांची लेखी संमती घेऊन नवीन कामगारांची नोंदणी करावी.

**३)राजीनामा दिलेल्या माथाडी कामगारांच्या जागेवर नोंदणीबाबत खालील बाबींची पूर्तता झाल्यानंतर माथाडी कामगाराची नोंदणी करावी.**

१ राजीनामा दिलेल्या कामगाराच्या जागेवर संबंधित माथाडी कामगाराचा मुलगा/ त्याचा सख्खा भाऊ / पुतण्या (सख्या भावाचा मुलगा) किंवा जावई (मुलीचा नवरा) यांना क्रमवारीनुसार नोंदीत करावे परंतू या नात्यापैकी कोणी उपलब्ध नसल्यास त्या जागी कामगाराने सुचविलेल्या व्यक्तीची टोळीतील २/३ (दोन तृतियांश) माथाडी कामगारांची लेखी संमती घेऊन नोंदणी करण्यात यावी.

**४)अनुकंपा नोंदणीबाबत खालील बाबींची पूर्तता झाल्यानंतर माथाडी कामगाराची नोंदणी करावी.**

१ मयत माथाडी कामगाराच्या जागेवर संबंधित माथाडी कामगाराचा मुलगा/ त्याचा सख्खा भाऊ/ पुतण्या (सख्या भावाचा मुलगा) किंवा जावई (मुलीचा नवरा) यांना क्रमवारीनुसार नोंदीत करावे परंतू या नात्यापैकी कोणी उपलब्ध नसल्यास त्या जागी मयत कामगाराच्या वारसाने शिफारस केलेल्या व्यक्तीची संबंधित टोळीतील २/३ (दोन तृतियांश) माथाडी कामगारांची लेखी संमती घेऊन नोंदणी करण्यात यावी. तथापि संबंधित टोळीस काम उपलब्ध असल्यास व २/३ (दोन तृतियांश) टोळीने संमती दिली नाही तर मंडळाच्या अध्यक्ष / सचिव यांनी त्यांना असलेल्या अधिकाराचा वापर करुन संबंधित माथाडी कामगारांची नोंदणी करावी.

**५) माथाडी कामगाराची एका टोळीतून दुस-या टोळीत अदलाबदल करावयाची असल्यास खालील बाबींची पूर्तता झाल्यानंतर माथाडी कामगाराची नोंदणी करावी.**

१ माथाडी कामगाराची एका टोळीतून दुस-या टोळीत बदली करावयाची असल्यास ज्या टोळीत बदली करावयाची आहे त्या टोळीतील २/३ (दोन तृतियांश) कामगारांची मागणी व संमती प्राप्त करुन घेणे व तद्नंतर नोंदणी करावी.

**६) काही मंडळांमध्ये एखाद्या मालकाकडे मासिक पगारावर असलेल्या माथाडी कामगारांची खालील बाबींची पूर्तता झाल्यानंतर माथाडी कामगाराची नोंदणी करावी.**

१ काही मंडळांमध्ये माथाडी कामगार मालकाकडे मासिक पगारावर काम करतात. त्या माथाडी कामगारांच्या टोळीत नवीन माथाडी कामगारांची वाढ करावयाची असल्यास संबंधित टोळीतील २/३ (दोन तृतियांश) कामगारांची संमती तसेच संबंधित मालकाची संमती घेणे आवश्यक आहे. या सर्व बाबींची पूर्तता झाल्यानंतर नवीन कामगारांची नोंदणी करावी.

तथापि माथाडी कामगारांच्या नोंदणीबाबत काही वाद उद्भवल्यास अशी प्रकरणे कामगार आयुक्त आपल्यामार्फत शासनास सादर करतील व शासन माथाडी अधिनियमाच्या कलम ७(४) अन्वये असलेल्या अधिकारांचा वापर करुन त्याबाबत निर्णय घेईल.

उपरोक्त आदेश हे महाराष्ट्र माथाडी हमाल आणि इतर श्रमजिवी कामगार (नोकरीचे निमयन व कल्याण) अधिनियम, १९६९ मधील कलम ७(४) अनुसार शासनास प्राप्त झालेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत असून सदर आदेशाची अंमलबजावणी तात्काळ प्रभावाने करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**( कविता गुप्ता )**
**सचिव (कामगार)**

प्रति- (१)कामगार आयुक्त, कॉमर्स सेंटर, ताडदेव, मुंबई.
(२)सह कामगार आयुक्त (माथाडी), कॉमर्स सेंटर, ताडदेव, मुंबई.
(३) अध्यक्ष, सर्व माथाडी मंडळे

प्रत माहितीसाठी- मा.मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव
मा.राज्यमंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव
मा.प्रधान सचिव (कामगार) यांचे स्वीय सहाय्यक
निवडनस्ती (कामगार-५)